


# श्रीमाताजींप्रति उन्मुखता


**अभीप्सा**

अखिल भारतीय पत्रिका

मे २०२६

वर्ष ५१ अंक ०५



श्रीमाताजी

# अभीप्सा

(ईश्वराप्रति असलेली आस)

**प्रकृती ती जड । करील उघड । ईश्वरी ते रूप । सुघटित ।।**

---


**प्रकाशक**

श्री. प्रदीप नारंग, पुडुचेरी

**प्रकाशन स्थळ**

श्रीअरविंद सोसायटी

सोसायटी हाऊस, ११ सेंट मार्टिन स्ट्रीट, पुडुचेरी – ६०५००१



**संपादक**

डॉ. केतकी मोडक, पुणे

भ्रमणध्वनी : ९४२१०१६०८९

ई–मेल : editorabhipsa2018@gmail.com



**मुद्रक**

सेन्थिल ऑण्डवर प्रेस, पुडुचेरी – ६०५००१


**चिंतनार्थ...**

साधक : अतिमानसाच्या अवतरणासाठी आम्ही कोणती भूमिका बाळगली पाहिजे?

श्रीअरविंद : भूमिकेबाबत म्हणाल तर, तुम्ही त्याची चिंता करण्याचे कारण नाही. संपूर्ण श्रद्धा, खुलेपणा, श्रीमाताजींप्रति आत्मदान ही एकच अट कायम आवश्यक असते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 448)

*

# श्रीमाताजींप्रति उन्मुखता

संपादकीय........................................................................०२
उन्मुखता किंवा खुलेपणा म्हणजे काय?...............................०३
श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांच्याप्रति उन्मुखता.......................०७
दैनंदिन कर्म आणि खुलेपणा............................................१६
खुलेपणा आणि चैत्य पुरुष..................................................२४
खुलेपणातील अडचणी...........................................................२९
पूर्णयोगातील खुलेपणाचे स्थान...........................................३४

---

## संपादकीय

पूर्णयोगाच्या साधनेच्या आरंभापासूनच श्रीअरविंद हे साधकाला ''श्रीमाताजींप्रति स्वतःला उन्मुख करा,'' हा मार्ग सांगतात. अर्थात सर्वांगीण उन्मुखता, खुलेपणा ही काही साधीसोपी गोष्ट नाही. ती दीर्घकाळपर्यंत चालणारी प्रक्रिया असू शकते. पण साधकाला एकदा का खुलेपणाचे रहस्य उलगडले तर त्याची साधनामार्गावरील वाटचाल अत्यंत आनंददायी होऊ शकते, याची ग्वाही श्रीअरविंद आणि श्रीमाताजी आपल्याला देतात.

श्रीमाताजींप्रति उन्मुख व्हायचे म्हणजे काय, त्याची आवश्यकता काय, त्याचा परिणाम काय होतो, पूर्णयोगात त्याचे स्थान काय आहे, या व यासारख्या अनेक मुद्द्यांच्या आधारे 'उन्मुखता' या एका महत्त्वाच्या गुणावर 'अभीप्सा' मासिकाच्या या अंकात प्रकाश टाकला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

*

---

अभीप्सा मासिक हे श्रीअरविंद सोसायटी, पाँडिचेरीचे मुखपत्र आहे.

---

'अभीप्सा' मासिकामध्ये श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांच्या विचारांचा मराठी अनुवाद समाविष्ट केलेला असतो.

# उन्मुखता किंवा खुलेपणा म्हणजे काय?

## उन्मुखता किंवा खुलेपणाचे स्वरूप

साधक : खरी उन्मुखता, खुलेपणा (opening) म्हणजे काय?

श्रीअरविंद : श्रीमाताजींच्या अस्तित्वाप्रत आणि त्यांच्या शक्तीप्रत असणारी ग्रहणशीलता म्हणजे खरी उन्मुखता किंवा खुलेपणा.

साधक : खुलेपणाचा योग्य आणि परिपूर्ण असा नियम कोणता?

श्रीअरविंद : अभीप्सा, अविचलता आणि श्रीमाताजींच्या शक्तीचा स्वीकार करण्यासाठी स्वतःला व्यापक बनविणे, तसेच दिव्यत्वाकडे जाण्याच्या मार्गात ज्या गोष्टी आड येतात त्या सर्व गोष्टींना नकार देणे.

साधक : मी नकळत श्रीमाताजींव्यतिरिक्त अन्य कोणत्या शक्तींप्रत तर खुला होत नाहीये ना, हे मला कसे कळेल?

श्रीअरविंद : तुम्ही सजग राहिले पाहिजे आणि तुमच्यामध्ये अस्वस्थकारी, इच्छावासनात्मक किंवा अहंकारी अशा कोणत्याही गतिविधी असणार नाहीत, याकडे लक्ष दिले पाहिजे.

साधक : खऱ्या खुलेपणाची लक्षणे कोणती?

श्रीअरविंद : तुम्हाला दिव्य शांती, समता, विशालता, प्रकाश, आनंद, ज्ञान, सामर्थ्य यांची जाणीव होऊ लागते; तुम्हाला श्रीमाताजींच्या अस्तित्वाची किंवा त्यांच्या सान्निध्याची किंवा त्यांच्या शक्तिकार्याची जाणीव होऊ लागते इत्यादी. आणि या साऱ्या गोष्टी एकदमच दिसू लागतात. यांपैकी कोणतीही एखादी गोष्ट जाणवली तर असे समजावे की, तेथे उन्मुखता, खुलेपण आहे. जितक्या जास्त गोष्टी आढळतील तेवढे खुलेपण अधिक परिपूर्ण असते.

साधक : अस्तित्वाच्या साऱ्या गाठी खुल्या करण्याचा मार्ग कोणता?

श्रीअरविंद : व्यक्तीकडे अभीप्सा असेल, तिने दिव्य शक्तीच्या कार्याला सहमती दिली आणि तिच्यामध्ये त्या शक्तीचे कार्य व तिचे अवतरण झाले तर या गोष्टींमुळे अस्तित्वाच्या साऱ्या गाठी खुल्या होतात.

साधक : श्रीमाताजींपासून कोणतीही गोष्ट लपवून न ठेवणे म्हणजे उन्मुखता का?

श्रीअरविंद : ती उन्मुखतेची केवळ पहिली पायरी झाली.

साधक : व्यक्ती उन्मुख, खुली कशी होऊ शकते?

श्रीअरविंद : अविचल मनामधील श्रद्धा आणि समर्पण यांच्याद्वारे व्यक्ती खुली होऊ शकते.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 150-151)

*

## श्रीमाताजींप्रति उन्मुखता

श्रीमाताजी तुमच्यामध्ये कार्य करत असताना, तुमच्याकडून त्या कार्यास नकार दिला जाणार नाही किंवा त्यात अडथळा येणार नाही अशा रितीने तुम्ही श्रीमाताजींकडे वळलेले असणे म्हणजे उन्मुख, खुले असणे.

एखाद्या व्यक्तीचे मन जर स्वतःच्या कल्पनांमध्येच बंदिस्त राहिले आणि त्याने जर स्वतःमध्ये दिव्य प्रकाश व दिव्य सत्य उतरविण्यासाठी, श्रीमाताजींना कार्य करू देण्यास नकार दिला तर ती व्यक्ती उन्मुख झालेली नाही, असा त्याचा अर्थ होतो.

एखाद्या व्यक्तीचा प्राण जर स्वतःच्या इच्छावासनांनाच चिकटून राहिला आणि श्रीमाताजींची ऊर्जा, जी खरी प्रेरणा व खरा आवेग घेऊन येत असते, त्या गोष्टींना जर प्राणाने स्वतःमध्ये प्रवेश करू दिला नाही तर, ती व्यक्ती उन्मुख झालेली नाही, असा त्याचा अर्थ होतो.

एखाद्या व्यक्तीचे शरीर जर स्वतःच्या इच्छा, सवयी व जडत्वामध्येच बंदिस्त राहिले आणि त्यामध्ये दिव्य प्रकाश व दिव्य शक्तीचा प्रवेश होऊ देण्यास आणि त्यांना कार्य करू देण्यास शरीराने मुभा दिली नाही, तर ती व्यक्ती उन्मुख झालेली नाही, असा त्याचा अर्थ होतो.

एकाच वेळी सर्व गतिविधींमध्ये संपूर्णतया खुले, उन्मुख होता येणे शक्य नसते, परंतु (फक्त मनामध्येच नव्हे तर) तुमच्या प्रत्येक भागामध्ये एक मध्यवर्ती उन्मुखता (central opening) असली पाहिजे आणि केवळ

श्रीमाताजींच्या कार्यालाच प्रवेश करू देईल अशी प्रभावशाली अभीप्सा व संकल्पशक्ती असली पाहिजे, उर्वरित सर्व गोष्टी दिव्य शक्तीद्वारे चढत्यावाढत्या क्रमाने केल्या जातील.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 151)

*

श्रीमाताजींप्रति उन्मुख असणे म्हणजे सदोदित शांत, आनंदी आणि आत्मविश्वासयुक्त असणे; अस्वस्थ नसणे, तक्रार न करणे, निराश न होणे. श्रीमाताजींच्या शक्तीला तुमच्यामध्ये कार्य करू देण्यास, तुम्हाला मार्गदर्शन करू देण्यास आणि ज्ञान, शांती व आनंद प्रदान करू देण्यास तुम्ही वाव देणे म्हणजे उन्मुख, खुले असणे. तुम्ही जर स्वतःला खुले ठेवू शकत नसाल तर, त्यासाठी सातत्याने आणि शांतपणे अभीप्सा बाळगा.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 151)

*

## धीर धरा

उन्मुखता किंवा खुलेपणा ही गोष्ट काही अगदी सुरुवातीपासूनच पूर्णत्वाला पोहोचलेली असते असे नाही. सुरुवातीला अस्तित्वाचा एखादा भाग उन्मुख होतो आणि चेतनेचे इतर भाग हे अजूनही बंद किंवा अर्धवट उन्मुख झालेले असतात; ते सर्वच्या सर्व भाग खुले व्हावेत म्हणून व्यक्तीने अभीप्सा बाळगणे आवश्यक असते.

अगदी सर्वोत्तम आणि प्रगत अशा साधकांमध्ये देखील पूर्ण खुलेपण येण्यासाठी काही कालावधी लागतो. एखादा साधक कोणताही संघर्ष न करताच, अध्यात्ममार्गाच्या वाटचालीमध्ये आड येणाऱ्या गोष्टी सोडू शकला आहे, असे आढळत नाही. त्यामुळे, तुम्ही अडीअडचणीच्या वेळी श्रीमाताजींकडे मदतीसाठी याचना केलीत तर ती त्यांच्यापर्यंत पोहोचणार नाही, असे समजू नका. मानवी प्रकृतीच्या अडीअडचणी श्रीमाताजींना ज्ञात असतात आणि त्यामुळे श्रीमाताजीच तुम्हाला त्या साऱ्यामधून बाहेर पडण्यासाठी साहाय्य करतील.

धीर धरा, श्रीमाताजींपाशी नेहमी प्रार्थना करत राहा. तसे केलेत तर, प्रत्येक अडचणीनंतर तुमची प्रगतीच होईल.

– श्रीअरविंद (CWSA 32 : 156-157)

*

## खुलेपणासाठी उपयुक्त तीन प्रतिमा

(ईश्वराप्रति खुले राहाण्यासाठी व आत्मदान करण्यासाठी साधकाला पुढील प्रतिमा साहाय्यभूत ठरू शकतात.)

१) सर्व प्रकारचा अभिमान, ताठा समर्पित करून, परिपूर्ण विनम्रतेने ईश्वराच्या चरणाशी साष्टांग दडंवत करायचा.

२) स्वतःचे अस्तित्व ईश्वरासमोर उलगडायचे, स्वतःचे शरीर संपूर्णपणे नखशिखांत त्याच्यासमोर खुले करायचे. जणू एखादे पुस्तक उघडावे त्याप्रमाणे, व्यक्तीने आपल्या शरीरांतर्गत असणारी सर्व चक्रं खुली करायची, जेणेकरून, त्यांच्यामधील कोणतीच गोष्ट लपून राहणार नाही आणि त्यांच्यामधील सर्व गतिविधी पूर्ण प्रांजळपणे, सुस्पष्टपणे दिसू शकतील अशा पद्धतीने स्वतःस खुले करायचे.

३) व्यक्तीने ईश्वराच्या कुशीमध्ये पहुडायचे आणि अतिशय हळुवारपणे, परिपूर्ण विश्वासाने त्याच्यामध्ये विलय पावायचे.

या क्रियांची कल्पना करताना, त्या त्या परिस्थितीनुसार, पुढीलपैकी एखाद्या सूत्रामधील भाव तुमच्या मनात असला पाहिजे :–

१) हे ईश्वरा, माझा नाही तर, तुझाच संकल्प सिद्धीस जावो.

२) हे ईश्वरा, तुझ्या इच्छेप्रमाणेच सारे घडू दे.

३) हे ईश्वरा, मी अनंतकाळासाठी तुझाच आहे.

सर्वसाधारणपणे, या तिन्ही क्रिया जेव्हा सुयोग्य पद्धतीने केल्या जातात तेव्हा त्याचा परिणाम म्हणून परिपूर्ण एकात्मता, अहंभावाचे विलयन आणि अत्त्युत्तम आनंद या गोष्टी घडून येतात.

– श्रीमाताजी (Conversation with a disciple : October 19, 1955)

**

नमस्कार वाचकहो,

अभीप्सा मासिकातील काही पाने आपल्या अवलोकनार्थ येथे देण्यात आली होती. आपल्याला ह्या अंकातील विषयावरील आणि यासारख्या इतर विषयांवरील श्रीअरविंद आणि श्रीमाताजी यांचे विचार मराठीत समजून घ्यावयाचे असतील तर, आपण अभीप्सा मासिकाचे वर्गणीदार व्हावे, ही विनंती.

वर्गणीचा तपशील शेजारील पानावर दिला आहे.

– संपादक, अभीप्सा मासिक

## मासिकाचे स्वरूप

श्रीअरविंदांचे बहुतांशी सारे साहित्य मुळात इंग्रजी व बंगाली भाषेत आहे. तर श्रीमाताजी यांचे बहुतांशी वाङ्मय फ्रेंच व इंग्रजी भाषेत आहे. हे दुर्मिळ विचारधन मराठीत आणण्याचे प्रयत्न 'अभीप्सा' या मासिकाच्या माध्यमातून अव्याहतपणे चालू आहेत. पाँडिचेरीहून प्रकाशित होणाऱ्या श्रीअरविंद सोसायटीचे मुखपत्र असलेल्या 'ऑल इंडिया मॅगेझिन' या इंग्रजी मासिकाची मराठी आवृत्ती म्हणजे 'अभीप्सा.' १९७५ पासून हे मासिक नियमितपणे प्रकाशित होत आहे.

### वर्गणी व देणगीचा तपशील

वार्षिक वर्गणी : २०० रू. (१२ अंक)
तीन वर्षाचे दर : ५८० रू. (३६ अंक)
पाच वर्षांचे दर : ९६० रू. (६० अंक)
देणगीदार : ४००० रू.
(देणग्या 80 G अंतर्गत करसवलतीस पात्र आहेत.)

वर्गणी वा देणगीची रक्कम आपण ऑनलाईनदेखील भरू शकता.

### वर्गणी वा देणगी ऑनलाईन भरण्यासाठी बँकेचा तपशील

खातेदाराचे नाव : Sri Aurobindo Society
बँकेचे नाव : Central Bank of India, Pondicherry Branch
IFSC Code : CBIN0281354
A/C No. : 1235467709

*

**सूचना :** रक्कम भरल्याची पोहोचपावती व आपला संपूर्ण पत्ता membership@aurosociety.org आणि editorabhipsa2018@gmail.com या ईमेल आयडीवर पाठवावा ही विनंती; म्हणजे आपल्या पत्त्यावर अंक पाठवता येईल.

*

वर्गणीदारांना काही कारणाने अंक उपलब्ध न झाल्यास पुढील क्रमांकावर संपर्क करावा – श्री. गोविंद पोतदार ९३७३७२४५२०

# एका संगीतकाराचा जन्म

श्रीअरविंद–श्रीअरविंद आश्रमाशी संलग्न असणाऱ्या शाळेमध्ये संगीत विभागाचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला होता. या शाळेमध्ये सर्व वयोगटातील विद्यार्थी दाखल होत होते आणि त्या प्रत्येकाच्या वयोगटानुसार, त्यांच्या स्तरानुसार संगीताचे धडे निवडताना संगीत–शिक्षिका असणाऱ्या शोभादीदी मित्रा यांची त्रेधातिरपीट उडत होती.

एके दिवशी त्यांनी आपली ही परिस्थिती श्रीमाताजींना कथन केली. ''मी इतके वर्षे मेहनतीने वेगवेगळ्या बंदिशी गोळा केल्या होत्या, पण सर्व वयोगटातील विविध स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवायचे तर माझ्याकडे बंदिशींचा तेवढा संग्रह असला पाहिजे, पण माझ्याकडे तो तेवढा नाहीये. माताजी, मी आता काय करू?''

श्रीमाताजी त्यांच्याकडे पाहून म्हणाल्या, ''काहीच अवघड नाही. जे काही आवश्यक आहे ते निर्माण करा.'' तोपर्यंत शोभादीदींनी एकही रचना स्वतःहून स्वरबद्ध केली नव्हती, त्यामुळे असे नवीन एकदम कसे काय तयार करता येणार? अशी रास्त शंका त्यांच्या मनात आली. ती त्यांनी श्रीमाताजींजवळ बोलूनही दाखविली.

श्रीमाताजी क्षणभर स्तब्ध बसल्या आणि त्यांनी शोभादीदींच्या हाती काही फुले दिली. संध्याकाळी घराची आवराआवर करत असताना त्या हलक्या आवाजात काही गुणगुणत होत्या. आणि अचानक सुमधूर संगीताच्या जणू रेशीमलडीच एकामागून एक त्यांच्या मनात उलगडत गेल्या. पूर्वी कधीही ऐकल्या नव्हत्या अशा बंगाली स्वररचना त्यांना ऐकू येऊ लागल्या.

शोभादीदींनी श्रीमाताजींचे स्मरण केले आणि आता त्यांनी त्या रचना शांतपणे ग्रहण करायला सुरुवात केली. आधी नुसतेच संगीत कानी येत होते, नंतर अलगदपणे त्या संगीताला शब्दरूप प्राप्त होत गेले. त्यांनी त्या बंदिशी शब्दांकित करून घेतल्या.

श्रीमाताजींप्रति खुल्या झालेल्या शोभादीदींची चिंताच मिटून गेली होती. एवढेच नव्हे तर या प्रसंगातूनच शोभादीदींमधील गीतकाराचा व संगीतकाराचा जन्म झाला होता.

(आधारित – शोभा मित्रा, ऑरोविल विकी)

*